महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७० वे | दिनांक : ०२/०३/२०२६ | वार : सोमवार

## अजित पवारांचा अपघात नव्हे १००% घातपात : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी अजित पवार यांचा अपघात नव्हे तर १०० टक्के घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यांनी या प्रकरणी अजित पवारांच्या विमान अपघाताविषयी एएआयबीने सादर केलेल्या अहवालावर गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित केले आहे. एएआयबी अजित पवारांचे विमान झाडाला धडकून खाली कोसळले अशी तकलादू थेअरी देत असेल, तर त्यामुळे अजितदादांचा घातपात झाला हे स्पष्ट होते, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामती येथील एका विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर काल या घटनेला १ महिना पूर्ण झाल्यानंतर एएआयबीने (विमान अपघात तपास ब्यूरो) या घटनेशी संबंधित आपला प्राथमिक अहवाल जाहीर केला. या अहवालात अजित पवारांचे विमान प्रथम झाडाला धडकले आणि त्यानंतर खाली कोसळले असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त दावा केला आहे.

विजय वडेट्टीवार एएआयबीच्या अहवालावर 'साम' वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, एएआयबीच्या अहवालात विमान एका झाडाला धडकले आणि खाली कोसळल्याचे नमूद करण्यात आले आहे. ते अशी तकलादू थेअरी देत असतील तर त्यातून स्पष्ट होते की, अजितदादांचा अपघात नाही, तर घातपात आहे. तब्बल एका महिन्याने असा अहवाल आला. त्यात अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. माझ्या मते हा अहवाल पूर्णतः मॅनेज आहे. हा ठरवून दिलेला अहवाल आहे. हा १०० टक्के अपघात नाही. हा अजितदादांचा घातपातच आहे. सगळ्या गोष्टी कॅमेऱ्यामध्ये कैद झाल्या आहेत. ते विमान हवेतच उलटल्याचे दिसत आहे. त्यानंतर ते धाडकन खाली आपटले. त्यांचे म्हणणे आहे, कोणत्या तरी झाडाला अडकून कोसळले. असा अहवाल पाहिल्यानंतर त्यांना फटके मारले पाहिजेत. हा सत्य लपवण्याचा व दडपण्याचा प्रकार आहे हे या अहवालातून दिसते. या अहवालावर चर्चा झाली व्हावी अशी मागणी आम्ही करू, असे वडेट्टीवार म्हणाले.

एएआयबीने आपल्या २२ पानी अहवालात म्हटले आहे की, बारामती विमानतळावरील कमी दृश्यमानता, व्हीएफआर (Visual Flight Rules) नियमांचे उल्लंघन, एअरफिल्ड अपुऱ्या सुविधा, स्वतंत्र MET सुविधेचा अभाव यामुळे ही विमान दुर्घटना घडली. विशेषतः अपघातावेळी हे विमान अगोदर झाडांवर कोसळले. त्यानंतर ते खाली पडून त्याला आग लागली, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अजित पवारांच्या विमानाने लँडिंगच्या पहिल्या प्रयत्नानंतर गो अराऊंड केले. त्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात ते धावपट्टीच्या डाव्या बाजूला ५० मीटर अंतरावर कोसळले. अपघाताच्या काही क्षणापूर्वी कॉकपिटमधून 'ओह शिट' असा आवाज आला, असेही हा अहवाल सांगतो.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही एएआयबीच्या अहवालावर सवाल उपस्थित केला आहे. प्राथमिक अहवालात AAIB ने कोणता प्राथमिक निष्कर्ष काढला? CID या अहवालाचा आधार घेऊन कसा तपास करणार आहे? या अहवालातील पान क्रमांक ४ वरील मुद्दा ५.१ मधील "Baramati Airfiled is situated in the Baramati District of the state Maharashtra" हे वाक्य AAIB ने हा अहवाल किती गांभीर्याने बनवला हे दाखवण्यासाठी पुरेसे आहे. मी मुंबईत यावर सविस्तर बोलेल, असे त्यांनी म्हटले आहे.

## सभागृह तहकुबीचे गुपित उघड; नीलम गोऱ्हे यांचे धक्कादायक विधान



**नाशिक :** राजकारणात आरोप - प्रत्यारोप नेहमीच सुरू असतात. पण त्यानंतरही पडद्यामागे वेगळीच समीकरणे जुळत असतात. हीच समीकरणे उघड करणारे एक विधान विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केले आहे. कधी कधी आम्ही ठरवून सभागृह तहकूब करतो, असे सांगत त्यांनी सत्ताधारी व विरोधकांतील पडद्यामागील 'समन्वय' उघड केला. त्यांच्या या विधानामुळे सभागृहातील गदारोळामागचे खरे राजकारण काय? यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

नाशिक येथील विश्व मराठी संमेलनात बोलताना नीलम गोऱ्हे यांनी वरील खुलासा केला. त्यांना परिसंवादात विधानभवनात होत असलेला गदारोळ हा कोणत्या व्याकरणाचा अलंकार आहे? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्या म्हणाल्या, विरोधक सभागृहात काही प्रश्नांवर गदारोळ घालतात. अर्थातच ते जो गदारोळ करतात त्यांची अपेक्षा असते की, त्यांना बोलायला मिळावे. उदाहरणार्थ, एखाद्या मंत्र्याच्या कार्यालयात पैसे सापडले. अशावेळी विरोधकांना चर्चा करायची असते. पण नियम असा आहे की, त्यांना अगोदर नोटीस द्यावी लागेल. मग मंत्र्यांवर आरोप करता येतील.

८ दिवसांपूर्वी मुंबई - पुणे महामार्ग बंद पडला. पण तो तारांकित प्रश्न होण्यासाठी त्याची मुदत गेलेली असते. विरोधी पक्ष हा त्याचा धर्म व जबाबदारी पाळत असतो. तर सत्ताधारी पक्ष हा बुद्धिबळाच्या पटलावर ज्याप्रमाणे दोन प्रकारची व्यूहरचना केली असते तशाच प्रकारच्या चालीचे पालन करत असतो. त्यातही एक सीक्रेट असते. सकाळीच आम्हाला विरोधक किती वेळ गदारोळ करणार हे ठावूक असते. तुम्ही किती वेळात सभात्याग करणार आहात? असा प्रश्नही आम्ही त्यांना करतो. काहीवेळा पीठासीन अधिकाऱ्याने १५ मिनिटे थांबायचे आणि सुरुळीत कामकाज करायचे असेही ठरलेले असते, असे त्या म्हणाल्या.

नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या, एखाद्यावेळी विरोधी पक्षाच्या नेत्याकडून अपशब्द वापरला जातो. तो हा शब्द मुद्दामहून वापरतो की सहज वापरतो हे सर्वांना कळते. पण अशावेळी सत्ताधारी पक्षाला कठोर भूमिका घ्यावी लागते. सभापतीलाही या प्रकरणी कठोर भूमिका घेत त्याच्यावर निलंबनाची कारवाई करावी लागते. हे निलंबन ७ दिवसांचे असते. मग ते खासगीत येऊन दिलगिरी व्यक्त करतात. मग हे निलंबन ३ दिवसांचे केले जाते पण दुर्दैवाने लोकसभेत अनेकदा चर्चाच केली जात नाही. विधिमंडळ हे चर्चेसाठी आहे. तिथे प्रत्येकाला बोलण्याची संधी देण्याची गरज असते.

## जबरदस्तीने मुस्लिम रीतिरिवाजाप्रमाणे माझे लग्न लावले : अनेकांसोबत शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले



**छत्रपती संभाजीनगर :** मी छत्रपती संभाजीनगरची तर माझा पतीपरभणीचा आहे. पण तो संभाजीनगरातचराहतो. २० फेब्रुवारीला तोआमच्या घरात आला. मलाव माझ्या मुलालालाथा-बुक्याने मारहाणकरुन गेला. सोबत ५ ते ६तोळे सोने व माझ्या वडिलांची मोपेडही नेली.वारंवार त्याला व त्याच्या आईला फोनकरूनही फोन उचलला नाही. ७-८ दिवस वाटपाहून २६ फेब्रुवारी २०२६ रोजी परभणीला गेले.तुम्ही माझी जिंदगी खराब केली. तुम्ही सर्वांनीमाझे शारीरिक शोषण केले. असे सांगून मी ११२वर कॉल केला. फिर्याद देण्यासाठी मी पोलिसस्टेशनला गेले. माझ्या पतीने गोड बोलून मैत्री वनंतर जबरस्तीने शारीरिक संबंध ठेवले. मीत्याच्याविरुद्ध यापूर्वीच छत्रपती संभाजीनगरातगुन्हा दाखल केला होता. मी मुस्लिम धर्मस्वीकारला. जबरदस्तीने मुस्लिम रितीरिवाजाप्रमाणे लग्न लावले. ४ महिने पती- पत्नी म्हणूनसोबत राहिलो. या दरम्यान अनेक लोकांनाघरी आणून जबरदस्तीने माझ्या सोबतशारिरीक सबंध ठेवण्यास भाग पाडले. याप्रकरणी मी विविध कलमान्वये दोन पोलिसठाण्यात गुन्हे दाखल केले.

२०२४ मध्ये माझ्या आईच्या मृत्यूनंतर तो माझ्यावडिलांच्या घरी आला. पुन्हा माझ्याशीजवळीक साधून सोबत राहू लागला. त्याच्याआई वडिलांच्या घरी परभणीला घेवून गेला.येथे ८-१० दिवसात माझा दीर माझी छेडकाढली. हा सर्व किस्सा पतीला सांगितलेअसता, त्याच्यासह सासू-सासऱ्यांनी मलालाथा बुक्क्याने मारहाण केली व धमकावले.मग, आम्ही संभाजीनगरला माझ्या वडिलांच्याघरी परतलो. १८ ते २१ ऑक्टोबर २०२५ तसेच ७जानेवारी २०२६ रोजी माझ्यावर पुन्हा ४ जणांनीपरभणीत घरातच जबरस्तीने बलात्कार केला.तू आमच्यावर केसेस केल्यात. आता तुलामजा येते का..? परभणी आमची आहे, असेम्हणून धमकावले. व माझ्या मांडीवर चाकूमारला. त्यावेळी माझी एका मौलानाने छेडकाढली. नंतर छत्रपती संभाजीनगरला माझ्यावडीलाच्या घरी आणून पुन्हा मारहाणकेली.पैसेही मागितले. म्हणून मी पतीसहसासू-सासरे व अन्य ७ जणांविरुद्ध कायदेशीरफिर्याद देत आहे.

पीडित तरुणीने परभणी शहरातील नानलपेठ पोलिस ठाण्यात२७ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ४:४६ मिनीटांनी फिर्याद दिली.या फिर्यादीनुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता-२०२३नुसार बलात्कार ६४ (१), सामूहिक बलात्कार ७० (१),शारीरीक संबंध ठेवणे, अश्लिल चित्रफित दाखवणे ७५(२), कायदेशीर कृत्य समजणे ७९, जीवे मारण्याची धमकी३५१ (२), तीक्ष्ण हत्याराने मारहाण करणे ११८ (१), इजापोचवणे ११५ (२), ऐका पेक्षा अधिक व्यक्तींनी गुन्हाकरण्याचे कलम ३ (५) नुसार गुन्हा दाखल आहे. आरोपींनाअद्याप अटक झालेली नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ मार्च २०२६


## मराठी भाषा दिन उत्साहात साजरा



**घाटनांदूर :** आज श्री सोमेश्वर कन्या प्रशालेत मराठी भाषा दिन अतीशय उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व प्रथम वि.वा.शिरवाडकर (कुसमाग्रज) यांच्या प्रतिमेस शाळेच्या मु. अ. श्रीम. एस. के. जाधव मॅडम यांनी पुष्पहार अर्पन करून विनम्र अभिवादन केले.तसेच शाळेत मराठी विषय शिकवणाऱ्या सह.शिक्षिका श्रीम. देशमुख मॅडम व श्रीम. एम. बी. उकरले मॅडम व श्री एस आर शेळके सर यांना शाळेतील विद्यार्थीनींनी पुष्पगुच्छ देवुन मन:स्वी शुभेच्छा दिल्या. आजच्या दिवसाचे औचित्य साधुन शाळेतील विद्यार्थीनींनी मराठी दिना बद्दल अभ्यासपूर्ण व सखोल परिपाठाच्या माध्यमातून कुसुमाग्रज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. व सुत्रसंचलन कु. अर्पिता मुंडे व कु. सिद्दीका दौंड यांनी केले.यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थीनी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## एन. एम. एम. एस. परीक्षेत ज्ञानेश्वर विद्यालयाची गरुडझेप; सहा विद्यार्थी उत्तीर्ण!

**छत्रपती संभाजीनगर :** शालेय स्तरावर अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) स्थानिक ज्ञानेश्वर विद्यालयाने देदिप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव!

या परीक्षेत विद्यालयातील खालील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत: * प्रांजल खरात * मनीषा खांडेकर * स्वरा जुमडे * प्रजित भगत * शिवराज सदावर्ते * आर्यन टोंगराज या सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. मान्यवरांकडून शाबासकीची थाप! विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे,पर्यवेक्षक संभाजी तांगडे, ज्येष्ठ शिक्षिका मंगल पवार आणि शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख डॉक्टर रवींद्र साठे, वर्गशिक्षक संतोष अधाने यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि विद्यालयाच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनाचे फळ असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. मार्गदर्शकांचे विशेष अभिनंदन!

या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचेही डॉ. संध्या मोरे यांनी विशेष अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी या कठीण परीक्षेत यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे ज्ञानेश्वर विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, पालकांकडूनही आनंदाचा वर्षाव केला जात आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## युवकांच्या नव विचारांचा फायदा ग्राम विकासासाठी व्हावा : ॲड प्रसन्न पाटील



**कन्नड :** "युवक हे नव विचारांनी भारावलेले असतात,त्यांच्याकडे नवनवीन कल्पना असतात त्यांनी आपल्या ऊर्जेचा वापर ग्रामीण विकासासाठी केला पाहिजे." असे प्रतिपादन ॲड प्रसन्न पाटील केले ते संत तुकाराम महा-विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत मौजे तेलवाडी येथे सात दिवसीय विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचे उद्घाटक म्हणून तेलवाडी चे सरपंच उत्तमराव राठोड हे होते, त्यांनी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या व सर्वतोपरी मदतीची ग्वाही दिली. यावेळी तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संतोष मतसागर यांनी विद्यार्थ्यांना शिबीराच्या माध्यमातून विविध गोष्टी शिकण्याचे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ शरद गावंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास समजावून सांगितला. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा डॉ सरला गोरे जि. प. शिक्षक आत्माराम राठोड उपस्थित होते. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. तुकाराम कोल्हे यांनी केले, त्यांनी शिबीरात होणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ कल्पना देशमुख यांनी केले तर आभार प्रा. डॉ. सुर्यकांत सांभाळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी : व्यापक क्षितिज - डॉ. मथुरा मेवाड



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन तसेच कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी देवगिरी महाविद्यालय येथील प्राध्यापिका व कवयित्री डॉ. मथुरा मेवाड या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई होत्या.व्यासपीठावर मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मीनाक्षी देव-निमकर, प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर, पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड उपस्थित होते.आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात डॉ. मथुरा मेवाड यांनी "मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी" या विषयावर मार्गदर्शन केले. मराठी भाषेतून विविध स्पर्धात्मक परीक्षा, अनुवाद क्षेत्र, प्रसारमाध्यमे, लेखन, संपादन आदी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित करताना मराठी साहित्य वाचनाची गरज त्यांनी सोदाहरण स्पष्ट केली. मराठी भाषेचे संवर्धन, विकास आणि संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक मराठी भाषिकाची असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. यावेळी त्यांनी आपल्या स्वरचित दोन कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.कार्यक्रमाच्या प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकातून प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी मातृभाषेची महती तसेच कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाविषयी सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन कु. तृप्ती ठाकूर हिने केले, तर प्रमुख अतिथींचा परिचय कु. वेदिका राजवैद्य हिने करून दिला. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांनी केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमास कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ मार्च २०२६


# बोलीभाषांच्या श्रीमंतीचे जतन - डॉ. सुधीर रा. देवरे

बोलीभाषा बोलायला आपण जिथेतिथे लाजत असतो, कारण आपल्याला आपल्या भाषेचाच कमीपणा वाटत असतो. हा न्यूनगंड आधी आपण आपल्यातून काढून घराघरात- गावात- शिवारात- शहरात आपली मातृभाषा असलेली बोली आपण सर्वांनी राजरोस बोलायला हवी. भाषा ह्या नावातच लोकसंस्कृती, सण, जत्रा, लोकपरंपरा, लोकोत्सव, विधी, विधीनाट्य, रीती, रुढी, लोकदेव-देवता, खेळ, लोकजीवन ह्या सगळ्यांचा विचार करावा लागतो. तसे पाहिले तर लोकसंस्कृतीतल्या सगळ्या घटनांतून- घटकांतूनच स्थानिक भाषांचा जन्म झालेला असतो. पारंपरिक लोकप्रथांमधून त्या त्या भागातल्या बोलींचा उगम झालेला आहे. त्या त्या भागात दरवर्षी ज्या वेगवेगळ्या विधी आपण करतो- पाळतो त्यातूनच पारंपरिक भाषेला संजीवनी मिळते. म्हणून आजही टिकून असलेल्या बोली ह्या आर्ष भाषा- जुन्या भाषा म्हणता येतील इतक्या त्या आदिम आहेत. अमूक ही भाषा अमूक भाषाची जननी आहे, अथवा अमूक ही बोली अमूक भाषेपासून तयार झाली अशी उलटी उत्पत्ती लावणे चूक आहे, हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

उदाहरणार्थ, अहिरानी बोलीत असे आजही अदमाशे दोनेकशे शब्द तरी नक्की सहज सांगता येतील, जे शब्द दुसऱ्या भाषेत कुठेच दिसत नाहीत. त्या शब्दांचा इतर भाषेतले धातू कोणाला माहीत नाहीत. त्यांची स्पष्ट व्युत्पत्ती लावता येत नाही. अशा खूप कारणांनी अहिरानीला आदिम भाषा म्हणता येईल, असे म्हणायला वाव आहे. पण आपण अजून तरी तशा आदिम भाषेचा दावा कोणाकडे केलेला नाही. सरकारकडे नाही की समाजाकडे नाही. एक शक्यता इथे बोलून दाखवली. फक्त अहिरानीतच सापडतील असे काही आठवतील ते शब्द इथे मुद्दाम देत आहे : झोऱ्या, मोचडं, मेचडं, डांजनं, खरंदगड, पांचफळक, धुतरूग, दारुदरफडा, झुलई, दडस, वरमाड, फुरका, वडगन, पोतारा, गागा, डाभुर्ल, सरमट, मट्यारं, बंग्या, साबडं, डिर, गेदू, कुटाना, गटाना, मोगरी, पिटनी, आबगा, येकलपाई, गवांदखाल, कचकाई, फिस्क, बुचकं, फिंद्रा - फिंद्री, फुई, फुवा, जीजी, मुऱ्हाळी, हू, बुचका, सुम, फसकारा, तोहमत, किलवाना, बावच्या, बऱ्हानी, बह्याळ, पट्यारा, लग्गर, हेंगाडं, खंतड, सुकाळीना, उकतं, ताम्हा, च्याहूर, वडांग, बंगळी, किलचन, आडेकडे, कवाड, बागेबागे, आग्या, कुश्टाळं, शे, सावटा, बट्ठा, फोत्र, सोला, साक्रू, कोंडाळं, पाटोड्या, डुबुक वडा, टहाळबन, डोंगरखाल, हेटे, वऱ्हा, रावन्या, गंगुती, आवळ्या, कोली, सोळी, सांजोरी, किलचन, सानं, सरी, आवते, नाडा, पुल्हाळ, चावळनं, ढेंगडं, ढुब्ब, आंगडं, कुरधानं, मांजन्या, तमान, साबडं, भनका, चोधडी, वैरन असे खूप शब्द सांगता येतील. आणि प्रत्येक बोलीत असे आगळेवेगळे शब्दभांडार आहे.

अशा शब्दांसोबतच शब्दगोळे म्हणजे वाक्प्रचारसुध्दा अहिरानीत खूप वेगळे दिसतात : टुमनं लावनं, ल्हाव करनं, रव करनं, ल्हनं नसनं, खिजी पडनं, हाय उफस करनं, आग पाखडनं, उजारी देनं, दनकारी देनं, डाच्च करनं, दडी मारनं, पोटमा बळी येनं, खिजी पडनं, उखाळ्या पाखाळ्या काढनं, उन्हात पाडनं, रुशी बसनं, बुरची घेनं, सरमाई जानं, हात वढाखाल ऱ्हानं, पान लागनं, चिपडं पडनं, काकडा वल्हावनं, हालकी वडांग ऱ्हानं, दिवाबत्तीनी येळ, लावदुऱ्या लावनं, उफडाई उठनं असे कित्येक. आणि सगळ्याच बोलीत असे वेगळे धन सापडेल.

अहिरानीतले पारंपरिक मौखिक साहित्याची यादी सहज वाचली तरी तिचा पसारा लक्षात येतो. तो पसारा माझ्या अनेक पुस्तकांतून याआधी आला आहे. असे सगळे शब्द, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, आण्हे, लोकगीते, लोककथा, लोकनृत्य, त्या त्या लोकबोलीतले कीर्तन, गोंधळ, वही असे पुष्कळ वेचून जपून ठेवावे लागेल, आवरुन ठेवावे लागेल, जतन करावे लागेल. याच्या पुढे अजून कोणता काळ कसा येईल कोणाला सांगता येईल? आणि हे भाषेचे धन एकदा बुडालं ना, आणखी जसेच्यातसे बाहेर जिवंत काढता येणार नाही. चाळीस- पन्नास वर्षांपूर्वी जे शब्द सहज जीभेवर यायचे, ते आज सहजासहजी येत नाहीत, तर कल्पना करा, हजार- पंधराशे वर्षांपूर्वीच्या शब्दांचे काय झाले असेल? आपापल्या बोलीभाषेतले असे असंख्य शब्द हरवले असतील. म्हणून आतातरी जागे होऊ. आज जे हयात आहेत ते शब्द याच्यापुढे जिवंत ठेवायचे असतील, तर आजचे हयात धन आपल्याला जतन (डाक्युमेंटेशन) करावे लागेल, तरच आताच्या सर्वच बोलीभाषा पुढच्या पिढीला जिवंत दिसतील.

यापुढे (एकाच भाषा पट्ट्यातली) इथली भाषा वेगळी आणि तिथली निराळी असा भेद भाषेत करायचा नाही. कोणतीही बोली कुठेही बोलली जात असेल तरी ती जतन केली पाहिजे. एकाच भाषेत थोडाबहुत भेदभाव होतो, तो करु नका. म्हणजे इथली भाषा अस्सल आणि तिथली भाषा नक्कल, असे खाजगीतही बोलू नका. तेव्हा बोलीभाषा टिकतील. जगातल्या कोणत्याही भाषेला कमी समजू नका. आपल्या व्यक्तीगत हौसमौजसाठी भाषेचे हलके राजकारण करू नका. केवळ प्रसिध्दीसाठीच्या राजकारणामुळे बहुतेक आपले स्वत:चे भले होईल, पण बोलीभाषांचे भले होणार नाही. भाषांचे इतके नुकसान होईल की ते कधीही भरुन निघणार नाही. भाषेचा विचार करताना त्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे, हे प्रथम लक्षात घ्या. माणूस माणसासोबत जोडत गेले की समाज तयार होतो. आणि हा समाज जोडण्यासाठी भाषेची गरज लागते. हे सर्व नीट लक्षात घेऊन आपण सर्व लोक एकमेकांशी जोडू. असे इथूनतिथून सर्व लोक जोडले गेले की मग भाषाही तग धरून उभी राहील. हे फक्त एखाददुसरी प्रमाणभाषेला लागू नाही. तसेच हे फक्त एखाद्या बोलीला लागू नाही. हे एकूणएक भाषेसाठी आपण बोलत आहोत. मग ती भाषा आजच्या मराठीसारखी प्रमाणभाषा असो, अथवा जगातील कोणतीही आपल्याला बोलता न येणाऱ्या भाषा असोत... ('दिव्य मराठी, रसिक', पुरवणी १ मार्च २०२६ मधील प्रकाशित लेख. इतरत्र प्रकाशित करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)


© डॉ. सुधीर राजाराम देवरे

ब्लॉगचा पत्ता :

http://sudhirdeore29.blogspot.com

/


# जंगलात रंगपंचमी

जंगलात पशु पक्ष्यांची
रंगपंचमी सुरू झाली
रंग उडवून माकडाने
पिचकारी केली खाली

लाल लाल रंगाने
न्हाऊन निघाला बगळा
गाढवाच्या अंगावर टाकला
काळा रंग सगळा

पिवळ्या रंगानी भरून
सशानी आणली पिचकारी
हत्तीवर रंग उडवितांना
हसू लागली सारी

हत्तीने उडविला मग
सोंडेने लाल रंग
मजा आली खरी
प्रत्येकाचे भिजले अंग

रंगपंचमी खेळण्यासाठी
कोल्हा गेला वाघाच्या घरी
बादलीभर काळा रंग
टाकला त्याच्या तोंडावरी

डोळ्यात रंग गेल्याने
वाघाने फोडली डरकाळी
वाट दिसेल तिकडे
कोल्हा सैरावैरा पळी




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


# देवगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी कनिष्ठ महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे टीम आचार्य प्रफुल्लचंद्र राय,टीम हरगोविंद खुराना, टीम सी. व्ही. रमण व टीम श्रीनिवासन रामानुजन याप्रमाणे गट तयार करण्यात आले होते.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये (राऊंड वन, राऊंड टू आणि राऊंड श्री) संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी मोठ्या हिरीरीने आणि खिलाडू वृत्तीने या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला आणि खऱ्या अर्थाने ज्ञान, आत्मविश्वास, विचारशक्ती आणि संघभावनेचे दर्शन घडवून आणले. प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अरुण काटे पर्यवेक्षक डॉ. किरण पतंगे पर्यवेक्षक डॉ.सीमा पाटील पर्यवेक्षक डॉ. राजन राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या आयोजनाचे सूत्रसंचालन प्रा.मंदाकिनी जाधव आणिप्रा.मशरत पठाण यांनी केले.स्पर्धेचे गुणांकन प्रा.अनुजा खापर्डे आणि प्रा. रूपाली थोरात यांनी अत्यंत पारदर्शक पद्धतीने केले. या प्रश्नमंजुषा स्पर्धेत टीम सी.व्ही.रमण यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला तसेच इतर संघांनीही उल्लेखनीय सहभाग नोंदविला.स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांच्या हस्ते वैज्ञानिकांचे चरित्रग्रंथ भेट देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यांनी लिहावं, बोलावं आपले विचार मांडून समृद्ध व्हावं यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. तसेच विज्ञानाचे तंत्र शिकत असताना विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकांचे चरित्राचे वाचन , मनन, चिंतन करावे असे आवाहनही केले.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वर्षा पाटील यांनी केले तर आभार पर्यवेक्षक डॉ. सीमा पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.कल्याण माळी, प्रा.बाळासाहेब पवळ,डॉ. रमेश शिंदे, प्रा.अश्विनी कुंभार,प्रा.सरोज पांडे यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ मार्च २०२६


## निमित्त विज्ञान दिनाचे




**काल** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त संभाजी नगरातील (औरंगाबाद) मातोश्री डॉ कंचन शांतीलाल देसरडा महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शनाची संधी. जवळपास ३० वर्षांपूर्वीचा अकरावी ,बारावी कला शाखेतील मराठी विषयाचा आमचा लाडका विद्यार्थी. वक्तृत्व, वाद-विवाद स्पर्धेत अग्रक्रमावर असलेला हसन इनामदार अतिशय प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर असलेल्या उमरगा तालुक्यातील केसर जवळगा या गावातून शैक्षणिक प्रवास सुरू झालेला...शिक्षणासाठी संभाजीनगर गाठून परिस्थितीवर मात करत शिक्षण पूर्ण करून मातोश्री डॉक्टर कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाची संभाजी नगरात स्थापना करून याच महाविद्यालयाचा प्राचार्य डॉ. हसन इनामदार यशस्वी झालेला...काल याच महाविद्यालयीन राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमासाठी माझ्या आवडत्या विद्यार्थ्याने मला अनाहूतपणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून निमंत्रित केले होते. महाविद्यालयाच्या वतीने कर्मचारी ,विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सजावट केली होती. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर विज्ञान विषयावरच्या आकर्षक रांगोळ्या रेखाटण्यात आल्या होत्या. महाविद्यालयाच्या वतीने भारतीय संविधान देऊन आमचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञानाच्या परिवर्तनाच्या चळवळीमुळेच माणूस जंगलातून, गुहेतून माणसात आला माणूस बनला. इंग्रजी सत्तेच्या राजवटीत विशिष्ट वर्गाची शिक्षण घेण्याची आणि देण्याची मक्तेदारी मोडीत काढून बहुजनांसह उच्चवर्णीय स्त्रियांना शिक्षणाची असलेली बंदी झुगारून महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आदींनी भारतीय सार्वत्रिक शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. ही ऐतिहासिक कामगिरी ज्यांनी केली तेच आपले नायक किंवा नायिका असल्या पाहिजेत असे आवाहन केले. या देशात मोघलांची सुमारे ७००ते ८०० वर्षे सत्ता असताना त्यांच्या विरोधात कोणतीही आंदोलने झाली असल्याचे इतिहासात नोंद नाही; पण दीडशे वर्ष झालेल्या इंग्रजी राजवटीच्या विरोधात आंदोलने का झाली? याचा दडवून ठेवलेला इतिहास आत्ता समोर यायला लागला आहे.शिक्षण घेऊन आत्ता कुठे बहुजन स्त्री पुरुष आणि उच्चवर्णीय स्त्रिया विविध राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय पदावर पोहोचल्या आहेत. पण ही सुवर्णसंधी देणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा त्यांना विसर पडून त्या बुवा बाबांच्या नादी लागल्या आहेत. केंद्र सरकारने आणलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे गरिब ,बहुजनांचे मरण असून पुन्हा एकदा गुलाम बनवण्यासाठीचा हा लोकशाही मार्गाने टाकलेला डाव आहे.विविध धर्मांच्या धर्मग्रंथातील असलेल्या अवैज्ञानिक दाव्यांचे दाखले देऊन व्यक्तीप्रामाण्यवाद, ग्रंथ प्रामाण्यवाद झुगारून बुद्धीप्रामाण्यवाद स्वीकारत विवेकवादी, विज्ञानवादी बनण्याचे आवाहन केले.कार्ल मार्क्सचे,"धर्म ही अफूची गोळी आहे." हे म्हणणे वर्तमान राजकीय संकुचित, विद्वेषी वाटचालीवरून सत्य आहे असे वाटते. राजेशाही, हुकुमशाही, महाजनशाही, सरंजामशाही यांचा डोलारा बहुतेक वेळा धार्मिक विद्वेषावरच उभा असल्याचे इतिहासातून दिसून येते. आजही भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने प्रस्थापित झालेल्या जगातल्या सर्वात महान लोकशाहीप्रधान देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानंतरसुद्धा धर्मांधर्मात ,जाती-जातीत कलह लावून आपल्या मतपेट्या भरून देशाची, देशातील नागरिकांची लूट सर्रासपणे सुरू आहे.विज्ञानातून पदवी, पदव्युत्तर, विद्यानिष्णात झालेली मंडळी सुद्धा अवैज्ञानिक अंधश्रद्धा यांच्या आहारी जात असल्याचे दिसून येते. यामुळे जागतिक संशोधनाच्या यादीतील क्रमवारीत एकही संशोधन नोंदवले गेले नाही ही अतिशय खेदाची बाब आहे.विद्यमान राज्यव्यवस्था, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, आरोग्य विभाग, कृषी विभाग इत्यादी जनकल्याणांच्या विभागांवर आणि त्यांच्या राजकारणी, प्रशासक, अधिकाऱ्यावर, भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल होताना दिसून येतात. अशावेळी आपण विवेकवादी विज्ञानवादी ,समतावादी, सत्यवादी, राष्ट्रवादी बनावे. बोगस राष्ट्रभक्त आणि राष्ट्रप्रेमी असल्याचा डांगोरा पिटणाऱ्यांना जागीच रोखावे असे आवाहन केले. विविध कृतीतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रांचे वितरण करण्यात आले.विद्यार्थी आणि मार्गदर्शक कर्मचारी यांच्या संयुक्त कृतीतून विज्ञान विषयक आकृत्या असलेली भीतीचित्रे आणि प्रतिकृती यांची मांडणी करून नाविन्यपूर्ण सजावटीतून विज्ञान दिनानिमित्त वैज्ञानिक संदेश देण्यात आला.आमचा उंच भरारलेला हसन आत्ता प्राचार्य संस्थापक डॉक्टर हसन इनामदार बनल्याचे पाहून सार्थ अभिमान वाटला. मला बोलावून मार्गदर्शन करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करत सर्वांना पुनश्च एकदा बुद्धीप्रामाण्यवादी माणूस बणून माणुसकी जिवंत ठेवण्याचे आवाहन करून निरोप घेतला.

**प्रा. डॉ. रमाकांत पाटील,**
सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख,
प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय
मुरूम. मो. 94203 33133

## ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** येथील ज्ञानेश्वर विद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या कै.पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात आयोजित या कार्यक्रमात विज्ञानातील विविध पैलू विद्यार्थ्यांनी प्रयोगांच्या माध्यमातून मांडले.कार्यक्रमाची सुरुवात आणि प्रमुख उपस्थितीकार्यक्रमाची सुरुवात भौतिकशास्त्राचे जनक आणि नोबेल विजेते डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका श्रीम. मंगल पवार होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक श्री संभाजी तांगडे व श्री.विनय बढे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम मंगल सुलताने यांनी केले. विद्यार्थ्यांनी सादर केले विविध प्रयोग आणि प्रकल्पविद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध प्रयोग, मॉडेल्स आणि माहितीपर तक्ते सादर केले. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता: विज्ञानावर आधारित नाटक: 'मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी पथनाट्य सादर केले. * वैज्ञानिक मॉडेल्स: यश बाफना याने 'पेरिस्कोप' आणि वर्किंग मॉडेल सादर केले. माहिती सादरीकरण नक्षत्रा पुसे हिने 'पृथ्वीची माहिती' दिली, तर सिद्धोत चव्हाण याने 'पाण्याचे दाब' या प्रयोगाचे सादरीकरण केले. विज्ञान रांगोळी: रेणुका काकडे आणि श्रुती राऊत यांनी विज्ञानावर आधारित आकर्षक रांगोळी काढली. थोर शास्त्रज्ञांची माहिती: विद्यार्थ्यांनी अलेक्झांडर फ्लेमिंग, आयझॅक न्यूटन आणि डॉ. सी. व्ही. रामन यांसारख्या थोर शास्त्रज्ञांच्या कार्याचा आढावा घेतला.सहभागया उपक्रमात पूर्वी कांसोटे, दिव्या कटक, रेणुका काकडे, गुंजन फत्तेलष्कर, ईशा बिरोटे, सौंदर्या मालकर आणि कार्तिकी वैष्णव यांसह इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## १५० रणरागिणी नी दौलताबाद किल्ल्यावर केली साफसफाई



**दौलताबाद (जावेद अहमद) :** सिंधुताई एकनाथ विखे पाटील रणरागिणी महिला मंडळ लोणी तालुका राहता जिल्हा अहिल्यानगर यांनी दि ०१ रविवारी देवगिरी दौलताबाद किल्ल्यावर साफसफाई करून अनमोल योगदान दिलेशालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धनश्री ताई सुजय विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सात वर्षां पासून या संस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात यात महिला चा समान प्रगती करिता विशेष प्रशिक्षण, महिला सबलीकरण,बचत गटाच्या माध्यमातून विशेष सहाय्य, दैनंदिन प्रक्रियेतून वेळ काढून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली जाते यात जवळपास ३०० महिला एकत्रित येऊन हे काम केले जात असल्याचे माहिती धनश्रीआज दौलताबाद किल्ला येथे १५० महिलांनी साफसफाई करून म्हैसमाळ येथील बालाजी मंदिर व भद्रा मारुती मंदिर येथे धनश्री सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत हे सफाई कामगिरी उपक्रम राबविण्यात आले आहे किल्याच्या भेट पुस्तकात धनश्री विखे पाटील यांनी किल्ला उत्तम प्रकारे उदाहरण असल्याचे नमूद केले त्यांना जावेद शेख यांनी किल्ला ची सविस्तर माहिती दिली किल्ला पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ मार्च २०२६


# 'प्रमाणिक आणि कर्तव्यदक्ष सहकारी' : प्रा. जितेंद्र बोडखे



**आ**युष्याच्या प्रवासात काही माणसं अशी भेटतात की ज्यांच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण एक आठवण बनून जातो. उद्या, २८ फेब्रुवारी रोजी माझा मित्र आणि सहकारी, प्रा. जितेंद्र बोडखे (भौतिकशास्त्र विभाग) देवगिरी महाविद्यालयातील आपल्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.माझा आणि जितूचा हा प्रवास केवळ सहकाऱ्यांचा नाही, तर तो एका घट्ट मैत्रीचा आहे.* मैत्रीचा आणि सहप्रवासाचा श्रीगणेशा...जितू आणि माझी मैत्री आमच्या बी.एस्सी.च्या वर्गापासून सुरू झाली. आणि आम्ही दोघेही, ४ ऑक्टोबर १९९३ ला एकाच दिवशी 'देवगिरी महाविद्यालयात' प्राध्यापक म्हणून रुजू झालो. मी रसायनशास्त्र विभागात आणि तो भौतिकशास्त्र विभागात. मी स्वतः मे २०२५ मध्ये सेवानिवृत्त झालो आणि आता माझा हा मित्रही निवृत्त होत आहे, याचे मन थोडे गहिवरले आहे.* विश्वासाची पावती आणि कुशल नेतृत्व:जेव्हा महाविद्यालयात जेईई-नीट सेलच्या शिस्तपालनाची जबाबदारी सोपवण्याचा विषय आला, तेव्हा उपप्राचार्य म्हणून माझ्या मनात पहिले नाव 'जितेंद्र'चेच आले. मीच त्याला या सेलमध्ये समाविष्ट केले होते आणि आज अभिमानाने सांगावेसे वाटते की, त्याने आपल्या कामाशी कमालीची प्रामाणिकता राखून ते यशस्वी करून दाखवले.या सेलच्या प्रवेशासाठी आपण जी प्रवेश परीक्षा घेतो, तिच्या प्रचाराची आणि शाळा भेटींची धुरा जितूने अत्यंत समर्थपणे सांभाळली. त्याच्या कुशल नियोजनाखाली आणि नेतृत्वाखाली आपल्या प्राध्यापकांनी दरवर्षी जवळपास १६५ शाळांना भेटी देऊन माहिती पोहोचवली. हे त्याच्या कामाचे व कौशल्याचे एक उत्तम उदाहरण आहे.* शिस्त आणि सतर्कतात्याची कामाप्रती असलेली निष्ठा वाखाणण्याजोगी होती* विद्यार्थी शिस्त प्रमुख: या भूमिकेत जितेंद्रने आपला वेगळा ठसा उमटवला. लंच ब्रेक मध्ये विद्यार्थी कुठे फिरतात, यावर त्याची करडी नजर असायची.* सतर्कता: विनाकारण फिरणाऱ्या विद्यार्थ्यांचे फोटो काढून, त्यावर दिनांक आणि वेळेची नोंद करून पालकांना कळवण्याचे काम त्याने अतिशय चोखपणे केले.* नियोजन: डाऊट सेशन्ससाठी शिक्षक वेळेवर येतात की नाही, याची तो सतत दखल घ्यायचा, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. • एक 'सरळ-साधा' आणि 'पापभिरू' माणूसजितू हा अत्यंत सरळ, साधा आणि पापभिरू स्वभाव असलेला माणूस आहे. आपल्या हातून कोणाचेही मन दुखावले जाऊ नये, याची तो नेहमीच दक्षता घेतो. कॉलेजमध्ये / स्टाफ रूममध्ये काही सहकारी त्याला मुद्दाम चिडवायचो. तेव्हा त्याच्या त्या भाबड्या स्वभावामुळे तो ज्या पद्धतीने आपणाला उत्तरे द्यायचा आणि मध्येच जो चिडायचा, त्यात एक वेगळीच निरागसता असायची. तो 'चिडणारा जितू' आम्हाला महाविद्यालयात दिसणार नाही."नोकरीतून निवृत्त होता येते, पण कर्तव्यातून आणि मैत्रीतून नाही." जितू, तुझा हा सेवानिवृत्तीनंतरचा काळ सुख, समाधान आणि उत्तम आरोग्याचा जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. तुझी उणीव महाविद्यालयात नक्कीच भासेल, पण तू जपलेली शिस्त, तुझे नेतृत्व आणि प्रामाणिकपणा कायम स्मरणात राहील.



•लेखन•
**प्रा.एन.जी. गायकवाड**
(संचालक, देवगिरी जेईई-नीट सेल, छत्रपती संभाजीनगर)

# गौरव मराठीचा जल्लोष बालमनाचा



**रघुनाथपूरवाडी :** जि. प. प्रा. शा. रघुनाथपूरवाडी येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने लेखक शिक्षक संजय जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकविध उपक्रम राबविण्यात आले. यानिमित्ताने स्वरचित कविता सादरीकरण, ओवी ,अभंग, विविध विषयांवरील कविता संकलन, नृत्य , रांगोळी रेखाटन, फलक लेखन, पुस्तक प्रदर्शन, मराठमोळी वेशभूषा इत्यादी उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या हस्तलिखितांचे प्रकाशनही करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक साईनाथ कवार, संजय जाधव सर ,जीबी पवार मॅडम, बी आर जाधव सर, सूर्यकांत फडसरसह पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# आज इथे उद्या तिथे

उघड्यावरचे जगणं,
जीवाशी असतो खेळ.
जीवनात जगतांना,
कशाचाच नसतो मेळ.

आज इथे उद्या तिथे,
कोणीही येऊन हुसकावतो.
कोणी नाही वाली म्हणून,
गोड गोड बोलून फसवतो.

उघड्यावरचे जगणं,
जीवावर बेतून जाते.
समाजात राहून सुद्धा,
जुळत नाही कधी नाते.

तुम्हीच सांगा दादा भाऊ,
जुळेल का आमची नाळ.
माणूस म्हणून जगतांना,
स्वीकार करणार का काळ.

काय करावे कसे जगावे,
आता कळतच नाही काही.
लोकशाहीचे सांभाळकर्ते,
वास्तव पाहतील का नाही.

उघड्यावरच जगणं आमचं,
खूप खूप अवघड असते.
सुरक्षिततेची जगतांना,
जीवनात कुठेच हमी नसते.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# युवकांनी आपल्यातील बलस्थाने ओळखली पाहिजे - डॉ. उषा झेर यांचे प्रतिपादन

**जालना :** येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी २०२६ ला युथ पार्लमेंटचे आयोजन करण्यात आले होते. विकसित भारत जिल्हास्तरीय युवा संसद यानिमित्ताने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. **"आणीबाणीची ५० वर्षे: भारतीय लोकशाहीसाठीचे धडे"** हा विषय होता. सहभागी स्पर्धकांनी इंग्रजी, हिंदी किंवा मराठी भाषेत आपले विचार व्यक्त केले. जिल्हास्तरावर निवडलेल्या उत्तम ५ विजेते राज्यस्तरीय फेरीसाठी पात्र ठरले जातील. विधानसभा मुंबई येथे त्यांचा प्रत्यक्ष सहभाग राहील. राज्यस्तरीय विजेते स्पर्धक दिल्ली येथील संसदेमध्ये सहभाग घेतील. युवा संसद ही संसदीय कार्य मंत्रालयाद्वारे राबवली जाते. यावेळी उद्घाटक म्हणून महाविद्यालय व्यवस्थापन संचालक डॉ. उषा झेर म्हणाल्या की, विकसित भारतामध्ये युवकांची भूमिका महत्त्वाची आहे. युवकांनी आपल्यातील बलस्थाने ओळखली पाहिजे. ज्ञानाला पर्याय नाही. करिअरची नवी दालने उपलब्ध होत आहेत त्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोमीनाथ खाडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्यातील आळस बाजूला सारून नव-नवी आव्हाने स्वीकारली पाहिजे. पराभूत मानसिकता तुम्हाला पुढे जाऊ देणार नाही त्यासाठी कठोर परिश्रम त्याने करावे. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, डॉ. कविता प्राशर, माय भारत जालनाचे जिल्हा युवा अधिकारी श्री. प्रणित सांगवीकर, प्रतिनिधी श्री. जयपाल राठोड यांची उपस्थिती होती.

**या स्पर्धेत प्रथम: पल्लवी रामकिशन धनगर, द्वितीय: मानस मनोहरराव डोल्हारकर, तृतीय: दिग्विजय काकासाहेब धांडगे, चौथा : आनंद गजानन पांचाळ, पाचवा : समीक्षा संजय कुलकर्णी** यांनी अनुक्रमे पारितोषिके प्राप्त केली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

प्रारंभी युवा संसद जिल्हा समन्वयक डॉ. उद्धव थोरवे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची भूमिका विशद केली. यावेळी प्रा.डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा.डॉ. सुजाता देवरे, प्रा. राजक्रांती वलसे, प्रा. श्रीनिवास मुंगे, प्रा. संभाजी कांबळे, यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन करून आभार प्रा. अभिजीत भुतेकर यांनी मानले.

डॉ. क्षमा अनभुले, प्रा. कल्याण कुंभार, प्रा. कालिदास सूर्यवंशी, प्रा.प्रवीण कोकणे, प्रा. शशिकांत चौधरी,प्रा. माधव हेबाडे, प्रा. निशिकांत लोखंडे, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी रामदास खरात, पवन मोरे, भार्गव आचार्य, अमोल जायभाये, सहाय्यक कर्मचारी सतीश सोनवणे, काशिनाथ खलसे, विलास घुमारे, रोहन वर्तले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी मेहनत घेतली..

# ‘होळी’ केवळ रंगोत्सव नाही तर ती सामाजिक आणि राजकीय बदलाचे शक्तिशाली साधनही बनू शकते.

***ज्या सणामुळे तुम्हाला कठोर सामाजिक नियम कायदेशीररित्या मोडण्याची संधी मिळते, ज्यामुळे नेहमीच्या नियमांविरुद्ध वागण्याची, तसेच सत्ताधाऱ्यांची खिल्ली उडवण्याची कायदेशीर परवानगी मिळते. अशा उत्सवाला मानाचा मुजरा.***

होळी हा सण नेहमीच एक उच्छृंखल, कधीकधी थोडासा बेफिकीर आणि नियम-कायद्यांना तात्पुरती बगल देणारा उत्सव म्हणून ओळखला जातो. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे, नेहमीच्या शिस्तीला थोडासा विराम देऊन, काही प्रमाणात मुक्तपणे वागण्याची संधी मिळते म्हणजे थोडाफार गडबड गोंधळ, मस्ती, खोडकरपणा अपेक्षित असते, जर सगळेच अगदी नियम पाळून वागले, तर वाईट वागण्याची ही ठरलेली आणि समाजाकडून मान्यता मिळालेली संधी वाया जाते. या सणाचा उत्साह आणि थोडीशी मस्ती काही अलीकडची नाही. ज्यांना उशिरा जन्म मिळाला आहे किवा ज्यांनी बोर्डिंग स्कूलमध्ये कठोर नियमांमध्ये आपले बालपण घालवले आहे, त्यांना कदाचित वाटेल की हा गोंधळ अलीकडचा आहे, पण तसे नाही, होळीची ही रंगांची उधळण, ढोल-ताशांचा गजर, आणि थोडीशी मस्ती पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहे. या सणाने नेहमीच समाजाला थोडासा विरंगुळा दिला आहे, रोजच्या जीवनातील ताण-तणावांना विसरून, थोडासा आनंद साजरा करण्याची संधी दिली आहे. होळीच्या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे रूढ सामाजिक प्रथांना स्पष्टपणे दिलेले आव्हान, मध्ययुगीन नोंदींनुसार, होळीच्या आदल्या रात्री, समाजात साचलेल्या असंतोषाला विविध दिशांनी वाट मोकळी करून देणारा एक महत्त्वाचा 'सुरक्षित झडप' म्हणून हा सण साजरा केला जातो, या रात्री, गावातील महिला त्यांच्या पुरुषांना आनंदाने झाडूने मारत असत, तर कनिष्ठ वर्गातील लोक उच्चवर्गीयांना शिव्या देत असत, याबरोबरच अनेकदा विटा आणि कचराही फेकून मारला जात असे.

गावातील खोडकर मुलांना या खेळकर हिंसक कृती विशेषतः आवडत असत, कारण त्यांना समाजात तात्पुरती उलथापालथ घडवून आणण्याची संधी मिळत असे. मथुरेतील नंदगाव आणि बरसाना हे प्रदेश, जिथे भगवान कृष्ण लहानपणी खेळले होते, त्यांच्या प्रसिद्ध 'लठ्ठमार होळी' साठी ते ओळखले जातात. या ठिकाणी होळीच्या दिवशी एक अनोखा आणि उत्साही खेळ खेळला जातो. या दिवशी महिला साडीच्या घड्यांमध्ये लपेटलेल्या काठ्यांनी पुरुषांना मारतात, हा खेळ म्हणजे सामाजिक बंधनांना तात्पुरते आव्हान देण्याचा एक प्रकार आहे. या खेळात, महिलांना पुरुषांपेक्षा अधिक सामर्थ्यवान दाखवले जाते, ज्यामुळे सामाजिक समतेचा संदेश दिला जातो. ही परंपरा भगवान कृष्णाच्या बाललीलांशी जोडलेली आहे, जिथे कृष्णाने गोपिकांसोबत खेळ खेळले होते. मात्र, महिला नेहमीच पुरुषांवर दया दाखवत नाहीत. कधीकधी, त्या पुरुषांना जोरदार मारतात, ज्यामुळे खेळ अधिक रोमांचक आणि मनोरंजक होतो. हे दृश्य पाहण्यासाठी दूरदूरहून लोक बरसाना आणि नंदगाव येथे येतात. या खेळात, महिला आणि पुरुष दोघेही सहभागी होतात, ज्यामुळे सामाजिक बंधने तात्पुरती विसरली जातात, आणि लोक एकत्र येऊन आनंद लुटतात. या खेळात, महिला आणि पुरुष यांच्यातील एक अनोखे नाते दिसून येते, लोकांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळते.

भांग हा (आणि आजही) या उत्सवाचा अविभाज्य भाग होता, जो होळीच्या रंगात अधिकच मिसळून गेला होता. त्याची पाककृती प्रत्येक कुटुंबात वेगवेगळी असे. यामुळे रंगाने माखलेले, उत्साहाने ओथंबलेले मिरवणुकीतील तरुण आणि त्यांचे वडीलधारी लोक, ज्यांच्या चेहऱ्यावरही रंगांचे असंख्य थर जमा झालेले असत, दोघेही ग्लासभर भांग मनसोक्त पिऊ शकत असत. भांगेच्या धुंदीत, सामाजिक मर्यादांचे बंधन सैल होत असे, आणि मग ज्यांची थट्टा केली जात आहे आणि जे थट्टा करत आहेत, त्यांच्यात फरक करणे कठीण होत असे. कोण कोणाची फिरकी घेत आहे, हेच समजत नसे.

होळी म्हणजे खोडकरपणाचा एक बहुरंगी रंगांची उधळण, भांगेची नशा आणि सामाजिक बंधनांची तात्पुरती शिथिलता यांचा अनोखा संगम होता. या काळात, समाजातील उच्च-नीच, गरीब-श्रीमंत हे भेद विसरून लोक एकत्र येत असत. पण, या सर्व गदारोळानंतर, होळी संपल्यावर एक मोठा दिलासाही मिळे. रंगांचे डाग धुतल्यावर, भांगेची नशा उतरल्यावर, आणि सामाजिक बंधने पुन्हा घट्ट झाल्यावर, लोक आपल्या दैनंदिन जीवनात परतत असत. होळीच्या अनुभवातून मिळालेला आनंद आणि समाधानाची भावना मात्र त्यांच्या मनात कायम राही. जर तुमच्या तोंडावर झाडू मारला गेला, किंवा तुमच्या पाठीवर काठी पडली, किंवा तुमच्या डोक्यावर गोमूत्र ओतले गेले, तर तुम्हाला ते सहन करावे लागेल. प्रचलित नियम बाजूला ठेवले गेले, पण फक्त या दिवसासाठी. या दिवशी, सामाजिक आणि कायदेशीर नियम तात्पुरते स्थगित केले जात असत, ज्यामुळे लोकांना त्यांच्या मनात साचलेला राग, असंतोष किंवा निराशा व्यक्त करण्याची संधी मिळत असे. ज्यामुळे समाजात साचलेला तणाव कमी होत असे. या काळात, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत हे भेद विसरून लोक एकत्र येत असत आणि एकमेकांसोबत खेळत असत. जरी काही लोकांना या काळात त्रास होत असला, तरी ते या दिवसाचे महत्त्व आणि सामाजिक कार्य लक्षात घेऊन ते सहन करत असत. या दिवशी, लोक एकमेकांना माफ करत असत आणि नवीन सुरुवात करत असत.

काही पुरातत्त्वज्ञांच्या अभ्यासानुसार, १६ व्या शतकातील बंगाली संत चैतन्य महाप्रभूचे दोन प्रमुख शिष्य रूप गोस्वामी आणि सनातन गोस्वामी यांनी, होळीच्या उत्सवाला एक विशिष्ट धार्मिक आणि सांस्कृतिक आयाम दिला. त्यांनी या सणाला राधा आणि कृष्ण यांच्या देवी प्रेमाचे प्रतीक म्हणून स्थापित केले, ज्यामुळे होळी केवळ रंगांचा उत्सव न राहता, भक्ती आणि अध्यात्मिक आनंदाचा सण बनला. या संतांच्या प्रयत्नांमुळे, होळीला एक अधिक औपचारिक आणि संरचित स्वरूप प्राप्त झाले, ज्यामुळे या उत्सवाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वामध्ये वाढ झाली. त्यानंतर, होळीच्या उत्सवामध्ये अनेक बदल झाले. सुरुवातीला, हा उत्सव केवळ सोम्य रंगांच्या उधळणीपुरता मर्यादित होता. परंतु कालांतराने, या उत्सवात अधिक खेळकर आणि विनोदी घटकांचा समावेश झाला, लोकांमध्ये रंगांची उधळण, एकमेकांवर पाणी फेकणे, आणि विविध प्रकारच्या खोड्या करणे यांसारख्या क्रियाकलापांना प्रोत्साहन मिळाले, या बदलांमुळे होळीचा उत्सव अधिक उत्साही आणि मनोरंजक बनला. यामुळे होळीला एका कार्निव्हलसारखे स्वरूप प्राप्त झाले.

कार्निव्हल्सप्रमाणे, होळी देखील नियंत्रणाबाहेर जाऊ शकते, आणि एका दिवसाच्या उत्सवाच्या सीमारेषा ओलांडून ती दीर्घकाळ चालणाऱ्या सामाजिक असंतोषाचे प्रतीक बनू शकते. हे केवळ तात्पुरते मनोरंजन किंवा सामाजिक नियम शिथिल करणारा सण न राहता, सत्तेला आव्हान देणाऱ्या, लोकांच्या असंतोषाला वाचा फोडणाऱ्या आणि सामाजिक बदलाची मागणी करणाऱ्या चळवळीचे रूप धारण करू शकते. लोकांच्या मनात साचलेला रोष आणि असंतोष लक्षात घेऊन, ब्रिटिश अधिकाऱ्यांनी १८५७ च्या बंडाच्या एक वर्ष आधी होळीच्या उत्सवांवर कठोर निर्बंध लादले होते. त्यांना भीती वाटत होती की, हा सण लोकांच्या भावना भडकवण्याचे आणि त्यांच्यात एकजूट निर्माण करण्याचे माध्यम बनू शकतो. होळी जवळपास शंभर वर्षे अधूनमधून उद्रेकाचे कारण बनली, आणि या काळात अनेक ठिकाणी होळीच्या निमित्ताने लोकांचा राग उफाळून आला. १९४२ च्या उत्तर प्रदेशातील गंगा मेळा बंडालाही होळीनेच सुरुवात केली. या बंडात, स्वातंत्र्यसैनिकांनी होळीच्या रंगांचा वापर करून ब्रिटिश सरकारविरोधात घोषणा दिल्या आणि लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. या घटना दाखवून देतात की, होळी केवळ रंगांचा सण नाही, तर ती सामाजिक आणि राजकीय बदलाचे शक्तिशाली साधनही बनू शकते. सत्तेला आव्हान देण्यासाठी आणि लोकांच्या भावना व्यक्त करण्यासाठी होळीचा वापर अनेकदा केला गेला आहे, ज्यामुळे या सणाला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. या सणाने अनेक सामाजिक बदलांना चालना दिली आहे.

कार्निव्हल्स त्यांच्या विध्वंसक क्षमतेमुळे नेहमीच भीतीदायक ठरले आहेत, कारण मोठ्या संख्येने लोक एकत्र जमल्यावर बंडखोरी आकर्षक वाटते. बायबलमधील रोमन गव्हर्नर पॉन्टियस पिलाटनेही नम्र ज्यूंच्या पासओव्हर सणाची संभाव्य मूलगामी परिणामांसाठी भीती बाळगली होती. मध्ययुगीन काळातही, मिखाईल बाख्तिन यांनी निरीक्षण केल्याप्रमाणे, नैर्ऋत्य जर्मनीतील उल्मसारख्या शहरांनी त्याच कारणास्तव कार्निव्हल्सवर बंदी घातली होती.


या घटनांमधून हे स्पष्ट होते की, सत्तेवर असणाऱ्यांना नेहमीच लोकांच्या एकत्र येण्याची भीती वाटत असते. जेव्हा मोठ्या संख्येने लोक एकत्र येतात, तेव्हा त्यांच्यात एक प्रकारची ऊर्जा निर्माण होते, जी सामाजिक आणि राजकीय बदलांना चालना देऊ शकते. कार्निव्हल्ससारख्या उत्सवांमध्ये, लोक सामाजिक बंधनांपासून तात्पुरते मुक्त होतात आणि त्यांच्या मनात साचलेला असंतोष व्यक्त करतात. त्यामुळे, ते लोकांच्या एकत्र येण्यावर आणि त्यांच्या अभिव्यक्तीवर निबंध घालतात. या घटनांमधून हेही दिसून येते की, लोकांच्या भावनांना दाबून टाकण्याचा प्रयत्न केल्यास, ते अधिक तीव्रतेने व्यक्त होतात. त्यामुळे, सत्तेवर असणाऱ्यांनी लोकांच्या भावनांचा आदर करणे आणि त्यांना योग्य प्रकारे व्यक्त होण्याची संधी देणे आवश्यक आहे."

"कार्निव्हल्समध्ये नेहमीच उच्च-नीच असा सामाजिक क्रम बदलला जातो, ज्यामुळे सामान्य जीवनातील नियम तात्पुरते विसरले जातात. होळीच्या काळातही, पूर्वी कनिष्ठ वर्गातील लोक निर्भयपणे सत्ताधाऱ्यांची खिल्ली उडवत असत. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे, कारण पारंपरिक भारतातील अवलंबित्व आणि आश्रय-संरक्षक संबंधांची जागा कराराधारित संबंधांनी घेतली आहे. त्यामुळे, पूर्वीच्या काळात अतिरेकी उल्लंघनांवर असलेले अलिखित नियम आता अस्तित्वात नाहीत. होळीमध्ये आजही कार्निव्हलचा रंग आणि उत्साह दिसून येत असला, तरी हल्ल्यांचे स्वरूप बदलले आहे. हे हल्ले आता केवळ स्थानिक पातळीवर न होता, विशिष्ट वांशिक गट किंवा वर्गांना लक्ष्य करणारे होत आहेत. पूर्वी होळीमध्ये होणारा खोडकरपणा आणि थट्टा-मस्करी आता तितकीशी निदर्दोष राहिलेली नाही. कारण, पारंपरिक सामाजिक संबंध आणि नियम आता उल्लंघनांच्या मर्यादांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ ठरत आहेत. पूर्वी, होळीचा उत्सव संपल्यावर, सामाजिक बंधने आणि मर्यादा पुन्हा स्थापित होत असत, आणि फक्त आदल्या दिवसाच्या आनंदी आठवणी शिल्लक राहत असत."

या बदलांमुळे, होळीच्या उत्सवाचे स्वरूप आणि महत्त्व बदलले आहे. पूर्वी होळी सामाजिक एकतेचे प्रतीक होती, पण आता ती सामाजिक तणावाचे आणि संघर्षाचे प्रतीक बनत आहे. कार्निव्हलचा घटक आजही कायम असला, तरी सध्या होळीचा वापर जुने हिशोब चुकते करण्यासाठी केला जाऊ शकतो. काही गावांमध्ये, सावकारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या जास्त व्याजदरांवरून त्यांच्यावर हल्ले झाले आहेत, परंतु हे क्वचितच घडते. अखेर, कानपूरच्या व्यापाऱ्यांनीच १९४२ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध गंगा मेळा सुरू केला होता, जो आजही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा ऐतिहासिक टप्पा आहे. यावरून हे स्पष्ट होते की, होळीचा सण सामाजिक आणि राजकीय बदलांसाठी एक व्यासपीठ म्हणून वापरला जाऊ शकतो.

आजकाल, होळीमध्ये लढणारे लोक कायमचे शत्रू असल्याप्रमाणे वागतात, जणू काही ते जन्मोजन्मीचे वेर धरून आहेत: ही भावना राजकीय शरीरावरच्या द्वेषयुक्त चामखीळींसारखी दिसते, याउलट, मुघल दरबारातील कलात्मक चित्रांमध्ये होळी आनंदाने खेळली जात असे, जिथे धर्म आड येत नसे. त्या काळात, धर्म हा केवळ एक वैयक्तिक विश्वास होता, आणि सामाजिक उत्सवांमध्ये तो अडथळा ठरत नसे. अलीकडच्या काळातही, विद्वानांनी मुस्लिम आणि हिंदू एकत्र मोठ्या जल्लोषात होळी साजरी करत असल्याचे नोंदवले आहे. केवळ जातच नव्हे, तर धर्मही अडथळा नव्हता. सामाजिक सोहार्दाचे हे दीर्घकालीन चित्र, जिथे लोक एकमेकांच्या धार्मिक भावनांचा आदर करत एकत्र सण साजरे करत, ते आता पूर्णपणे संपलेले नाही, परंतु काही ठिकाणी ते विखुरले आहे. भेदभावी ब्रिटिश राजवटीचा परिणाम होळीवरही झाला. त्यांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचा वापर करून समाजात फूट पाडली, ज्यामुळे धार्मिक आणि जातीय संघर्ष वाढले. होळी दरम्यानची पहिली जातीय दंगल १९१० मध्ये पेशावरमध्ये झाली. जी या भेदभावाचा एक स्पष्ट पुरावा आहे. आजकाल होळी हा सण समुदायांना वेगळे करते; हे त्या काळापासून एक दुःखद विचलन आहे, जेव्हा सर्व धर्मातील लोक एकत्र नांदत होते. कोणताही धार्मिक आदेश किंवा धार्मिक विद्वान आड येत नसे. सामाजिक सौहार्द इतके मजबूत होते की, धार्मिक मतभेद उत्सवांमध्ये अडथळा ठरत नसत.

होळीच्या हिंसाचाराच्या बातम्या सहजपणे प्रसिद्धी माध्यमांमध्ये झळकतात, तरीही, होळीतील कार्निव्हलचे घटक या उत्सवाला त्याचा मूळ आनंद आणि उत्साह प्रदान करतात. पूर्वी भारत प्रामुख्याने खेड्यांमध्ये वसलेला होता, जिथे पारंपरिक सामाजिक नियम आणि नैतिक मूल्ये मजबूत होती. परंतु, आता शहरीकरणामुळे आणि आधुनिक जीवनशैलीमुळे परंपरेची नैतिक मूल्यांवरील पकड कमी झाली आहे. त्यामुळे, केवळ मजा आणि आनंद उपभोगणाऱ्या लोकांमध्ये आणि कायदा हातात घेणाऱ्या हिंसक जमावामध्ये फरक करण्यासाठी कायद्याने हस्तक्षेप करणे आवश्यक झाले आहे. थोडक्यात, होळी म्हणजे सामाजिक बंधने झुगारून देण्याचा उत्सव आहे. या उत्सवात, लोकांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची, सामाजिक बंधनांपासून मुक्त होण्याची संधी मिळते. तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखताना, सामाजिक सोहार्द आणि सांस्कृतिक विविधता जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



**लेखक : प्रा. दीपांकर गुप्ता, समाजशास्त्रज्ञ, जेएनयू, नवी दिल्ली.**
**भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे, समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**
**सौजन्य : टाइम्स ऑफ इंडिया, दि. मार्च १२, २०२५**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०२ मार्च २०२६


# कसं काय महाराष्ट्र! विदेशी महिलांनी सूर



**दौलताबाद (जावेद अहमद) :** १३ देशांतील ६५ प्रतिनिधी सहभागी असलेल्या 'फॅमल रायझिंग टूर'ची सहल दौलताबाद किल्ल्यावर आनंद घेतलादि ०१ रविवारी सकाळी दौलताबाद किल्ल्यावर पोहोचताच विविध देशांतील पाहुणे, हातात कॅमेरे आणि मोबाइल घेऊन समोर उभ्या असलेल्या हजारो वर्षांच्या इतिहासाकडे आश्चर्याने पाहत मोबाईल मध्ये कैद केलेया प्रतिनिधींना दौलताबाद किल्ल्याचे माहिती गाइड डॉ. सुभाष जाधव यांनी दिली त्यांना महाकोट, अंबरकोट, सरस्वती विहीर, हाथी हौद,भारतमाता मंदिर,चांद मिनार, काळकोट, चिनी महल,रंगमहाल, मेंढा तोप, अंधारी या ठिकाणी जाऊन भेट दिली व किल्ल्याचा इतिहास जाणून घेतले किल्ला खूपच व अभेद असल्याचे मत किल्ला भेट पुस्तकात नमूद केलेयावेळी पर्यटन उपसंचालक विजय जाधव, सहायक जिल्हा पर्यटन अधिकारी अजिमोद्दीन शेख, सहायक जिल्हा पर्यटन अधिकारी शोएब शाह, पर्यटन सहायक डॉ. शिवाजी गायकवाड, विक्रांत म्हात्रे, साहिल शेख, अमिता खटावकर, दीपाली डिकोस्टा यांची प्रमुख उपस्थिती होती सहलीत आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हल एजंट, ब्लॉगर्स आणि इन्फ्लुएन्सर्सचा, पत्रकार यांचे समावेश असल्याने त्यांच्या माध्यमातून ऐतिहासिक अनुभव जागतिक पर्यटन समुदायापर्यंत पोहोचणार आहे.यामुळे अनेक देशातील पर्यटक पर्यटनासाठी येथे येतील व आपल्या छत्रपती संभाजी नगर पर्यटन स्थळ येथे रोजगार उपलब्ध होईल असे पर्यटक उपसंचालक विजय जाधव यांनी सांगितले आहे.

## वय सातव्या वर्षी श्रद्धेचा पहिला टप्पा; झारा अजमत शेखचा पहिला रोजा पूर्ण



**दौलताबाद (जावेद अहमद) :** रतनजी मोहला दौलताबाद येथिल झारा अजमत शेख वय सात वर्षे हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास पूर्ण केले आहे छोट्या रोजदार हिचे आजोबा शेख बने अल्पसंख्याक जिल्हा महामंत्री, आजी, आई वडील, मामा, आत्या, नातेवाईक यांनी तिचे कौतुक केले आहे

## होळीच्या दिवशी घृष्णेश्वर मंदिर दर्शनवेळेत बदल



**वेरूळ :** बारावे ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध असलेले घृष्णेश्वर मंदिर येथे ३ मार्च २०२६ (मंगळवार) रोजी होणाऱ्या खग्रास चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर दर्शनवेळेत बदल करण्यात आला आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ७ या चार तासांच्या कालावधीत मंदिर भाविकांसाठी बंद राहणार आहे.

धार्मिक परंपरेनुसार ग्रहणकाळात मंदिराचे दरवाजे बंद ठेवले जातात. प्रशासनाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार दुपारी ३:०० वाजल्यापासून गाभाऱ्यातील प्रवेश आणि दर्शन थांबवण्यात येईल. ग्रहणाचा काळ दुपारी ३:२० ते सायंकाळी ६:४७ पर्यंत राहणार आहे. ग्रहण संपल्यानंतर मंदिरात स्वच्छता व शुद्धीकरण पूजाविधी होणार असून सायंकाळी ७:०० वाजल्यानंतर दर्शन पुन्हा सुरू होईल.

मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कुणाल दांडगे यांनी भाविकांना वेळेचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. "ग्रहणामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त करतो; मात्र धार्मिक परंपरेनुसार निर्णय घेण्यात आला आहे. सायंकाळी ७ नंतर मंदिर सुरळीतपणे खुले राहील," असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, ३ मार्च रोजी होळी (धुलिवंदन) सण असल्याने भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. त्यातच वेरूळ येथील वेरूळ लेणी दर मंगळवारी देखभाल दिनामुळे बंद असतात. त्यामुळे त्या दिवशी लेणी आणि दुपारच्या सत्रात मंदिरही बंद राहणार असल्याने काही भाविक व पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दूरवरून येणाऱ्या भाविकांनी व पर्यटकांनी सुधारित वेळापत्रकाची नोंद घेऊन नियोजन करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाने केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002